पुढारी

संक्षिप्त




**पोलिस प्रशासनाला रोगप्रतिकार शक्तीची औषधे देताना अजय शिर्के व तुषार सुकालीकर.**

# क्विक हिलमार्फत पोलिसांना औषधे

**सातारा (पुढारी वृत्तसेवा) :** क्विक हिल फाऊंडेशनने श्री विश्वशक्ती आयुर्वेदिक चिकित्सालय, संशोधन केंद्राच्या माध्यमातून सातारा जिल्हा पोलिस दलातील ३ हजार पोलिसांना 'रस माधव वटी' या रोगप्रतिकार शक्ती औषधाचे वाटप करण्यात आले. याबाबतची माहिती क्विक हिलचे व्यवस्थापकीय संचालक डॉ.कैलास काटकर यांनी दिली. ही औषधे पोलिस मुख्यालयाचे (गृह) पोलिस उपअधीक्षक राजेंद्र साळुंखे यांच्याकडे सीएसआरचे प्रमुख अजय शिर्के, डॉ. विकास गिरी, डॉ. तुषार सुकालीकर, डॉ. सागर कवारे यांनी दिली. गेल्या तीन महिन्यांपासून कोरोना संसर्गाचा प्रादुर्भाव वाढत आहे. कोरोना विरुद्धच्या लढाईसाठी वैद्यकीय क्षेत्राबरोबरच महाराष्ट्रातील पोलिस परिस्थितीशी दोन हात करत आहेत. या योध्दांना कोरोना होऊ नये, त्यांची प्रतिकार शक्ती चांगली रहावी या सामाजिक हेतूने क्विक हिल फाऊंडेशन पुढाकार घेतला. प्रत्यक्ष मैदानावर कर्तव्य बजावणाऱ्या पोलिसांना या औषधांमुळे सुरक्षाकवच मिळणार आहे. पोलिसांनी ही औषधे घ्यावीत. त्याद्वारे स्वत:चे, कुटुंबीयांचे व समाजाचे स्वास्थ सांभाळावे, असे आवाहन क्विक हिलद्वारे करण्यात आले आहे.